# प्रेस नोट

जा.क्र. ५६५/१६,माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०४/०९/२०१६.

## गरोदर महीलेचा उपचारादरम्यान उपजिल्हा रूग्णालय तुमसर येथे मृत्य

तुमसर/ खापा येथील गुन्हयासंदर्भात (गरोदर महीला उपचारादरम्यान मृत्यु) झालेल्या गुन्हयाचे अनुषंगाने पोलीस अटक संबंधाने सभ्रम भितीचे वातावरनाची निर्मिती झाल्याने गावक–यांनी चुकीच्या अफवांनवर विस्वास न ठेवता देशाचे कायदे व शासनावर विश्वास ठेवावा.

सविनय सादर आहे की, घटना ता. २९/०८/२०१६ रोजी पो.स्टे. तुमसर, येथील दाखल मर्ग क्र. २०/२०१६ कलम १७४ जाफौ. मधील मृतक महीला नामे– जयश्री राजेश ठवकर वय २८ वर्ष रा. खापा हिचा मृत्यु तिचे बाळतपनात शासकीय सु.बो. उप.जिल्हा रूग्णालय, तुमसर येथे उपचार करना–या वैद्यकीय अधीकारी यांच्या हलगर्जीपणा व निष्काळजीपनामुळे झाला. त्यामुळे त्यांना निलंबित करावे व त्यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करावे या मागनी करीता मौजा–खापा चौक या राज्य मार्गावर खापा गावातील लोकांनी व यातील वर नमुद आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन, रास्ता रोको करून, रस्त्यावर टायरची जाळपोळ करून, रस्त्यावरील वाहने, एस.टी. बसेस अडवुण बसेसची तोडफोड करून, कायदा व सु–व्येवस्थेची मोठी पारीस्थिती निर्मान झाल्याने, गैर कायदयाच्या जमावावर सौम्य बळाचा वापर करून लाठीचार्ज करण्यात आला असता यातील आरोपीनी बंदोबस्तातील पोलीस अधीकारी, कर्मचारी यांचेवर दगडफेक करून एकुण पोलीस अधीकारी , कर्मचारी –१४ ना जखमी, जभर जखमी केल्याने फिर्यादीचे रिपोर्ट आणी जखमीचे एम.एल.सि. रिपोर्ट वरून गुन्हा दाखल करून तपासात आहे.

दि ३०/०८/२०१६ रोजी खापा येथे लाठीचार्ज झाल्याचे समजताच मा. पोलीस अधीक्षक विनीता साहू या घटनास्थळी हजर झाल्या स्थानिक जनता, सामाजीक, राजकीय कार्यकर्ते यांचेशी चर्चा करून जनतेस शांतता राखण्यास आव्हाण केले. त्यानंतर जमाव शांत झाला. जमाव नियंत्रणात आल्यानंतर खापा चौक येथे श्रीमती सुनीता बढे, अतीरीक्त जिल्हा शैल्य चिकित्सक, सा.रू. भंडारा यांनी चौकसी समीती गठीत केलेली असल्याचे नागरीकांना सांगीतले. परंतु, त्यांचेवर नागरीकांना विस्वास न वाटल्याने, नागरीकांनी घटनास्थळी जिल्हा शैल्य चिकित्सक, सा.रू. भंडारा यांनी यंवुन स्व:ता डॉ. डांगे यांना निलंबित करण्याची कर्यवाहीची माहीती दयावी, असे आव्हान केल्याने, जिल्हा शैल्य चिकित्सक, श्री धकाते हे मौजा यंथे हजर झाले. आणी त्यांनी चौकशी समीतीच्या चौकशी अंतीम कार्यवाहीचे आस्वासन दिले. त्यामुळे जमावातील नागरीकांनी लवकरात लवकर चौकसी करून अहवाल सादर करण्या बाबत त्यांना विनंती केली व ति विनंती मा.जिल्हा शैल्य चिकित्सक, भंडारा यानी मान्य केल्याने नागरीकांनी समाधान व्यक्त केले.

सदर गुन्हाचे घटनास्थळी मा. विशेष पोलीस माहानिरीक्षक सा., नागपुर परीक्षेत्र, नागपुर, श्री. रविद्र कदम साहेब यांनी भेट दिली.

नमुद गुन्हयाचे तपासात , दि. ३१/०८/२०१६ रोजी पुराव्या आधारे (११) आरोपीना अटक करण्यात आली. तद्नंतर, पोलीस स्टेशन, तुमसर येथे वरील प्रमाने वरीष्ठ पोलीस अधीकारी हजर असतांना, मा. आमदार, श्री चरनभाऊ वाघमारे, तुमसर विधानसभा क्षेत्र यांचे नेतृत्वात शिष्ठमंडळ पोलीस स्टेशन, तुमसर येथे हजर झाले आणी सदर गुन्हयाचे तपासात निरअपराध गावक—यांना नाहक त्रास होणार नाही व चुकीची अटक होणार नाही, याचा भान ठेवुनच तपास करून अटकेची कार्यवाही करण्यात यावी. तसेच, सध्या पोळा सन वगैरे असलयाने कोनालाही अटक करण्यात येवु नये. असे मौखिक निवेदन केले. तसेच, इतर ही राजकीय, सामाजीक कार्यकर्त्यानी त्याच प्रकारचे मोखिक निवेदन केले. त्यावर वरीष्ठ पोलीस अधीका—यानी कायदा व सुव्येवस्थेच्या कारणास्त तुर्तास अटक कार्यवाही थांबविण्याबाबत त्यांना आस्वासन देऊन, कायदेशिर रित्या पुराव्या आधारे तपास करण्यात येत असल्याची माहीती दिली आहे.

परंतु , काही संधी साधु अराजक व सामाजीक तत्व सदर संवेदनसिल परीस्थीतीचा फायदा घेवुन खापा गावातील सर्व सामाण्य नागरीकांनमध्ये पोलीस तपासा विषयी संभ्रम/ भितीचे वातावरन निर्माण करून पुन्हा का.व. सु.चि परीस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असुन, तसेच उलटसुलट चर्चा पसरवुन नागरीकांची दिशाभुल करून जनतेच्या संरक्षणार्थ तैनात असलेल्या पोलीस यंत्रणे विरूध्द आक्रोशाचे वातावरन चिर्माण करीत आहे.

दरम्यान दिनांक— ०३/०९/२०१६ चे रात्री ऊशिरा पर्यत मा. जिल्हा शैल्य चिकीत्सक यांचा प्राथमिक चौकसी अहवाल पोलीस स्टेशन, तुमसर येथे प्राप्त झाल्याने, वैद्यकीय अधीकारी, डॉ. संध्या डांगे यांचे विरूध्द अपराध क्र. १०१/२०१६ कलम ३०४(अ) भांदवि. चा गुन्हा दि.०४/०९/२०१६ चे रात्री ००/४० वा. दाखल करण्यात आलेला असुन, वरीष्ठ पोलीस अधीकारी यांचे मार्गदर्शनात गुन्हयाचा योग्य रित्या तपास सुरू आहे.

तथापी, विषयांकीत (लाठी चार्जचे) गुन्हयाचे तपासात कोणत्याही निरअपराध व्यक्तीला नाहक अटक होणार नाही. तसेच , गुन्हयाचा तपास योग्य पुराव्या आधारेच व योग्य रित्या वरीष्ठ पोलीस अधीकारी यांच्या मार्गदर्शनात करण्यात येत आहे. नाकरीकांनी मनात कसलीही भिती व संभ्रम बाळगु नये. तसेच देशाचे कायदे, पोलीस यंत्रणा आणी शासनावर विश्वास ठेवावा. व निर्भिड पणे जिवनयापन करावे, चुकीच्या अफवावर विश्वास ठेवु नये, पोलीस यंत्रणा नागरीकांच्या संरक्षणार्थ तैनात आहे. काही संका मनात असल्यास नि:संकोच पने पोलीस यंत्रणेशी संपर्ग साधावा, असे कळकळीचे जाहीर आव्हान करण्याबाबत वर्तमान पत्रामधे बातमी प्रसिद्धीस पुरविणेस प्रेस नोट यासह सविनय सादर आहे.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.